या उपक्रमाचा उद्देश राज्यातल्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा मार्गांवर उपग्रहाधारित जोडणी उपलब्ध करून देणं आहे. तसंच शिक्षण आणि टेलिमेडिसिन क्षेत्रातही स्मार्ट कनेक्टिव्हिटीचा लाभ देण्याची योजना आहे. महाराष्ट्र-स्टारलिंक सहकार्यामुळे ‘डिजिटल महाराष्ट्र’ या मिशनला अधिक गती मिळणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

आगामी काळात कुशल मनुष्यबळ तयार करण्याला शासनाचं प्राधान्य राहील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. महाराष्ट्र विधी विद्यापीठ मुंबईच्या नवीन वास्तूच्या पायाभरणी समारंभात आज ते बोलत होते. मुंबई, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर अशी ३ राष्ट्रीय विधी विद्यापीठं असलेलं महाराष्ट्र हे देशातलं एकमेव राज्य असल्याचं ते म्हणाले. या वास्तूच्या उभारणीसाठी सर्व प्रकारच्या परवानग्या घेतल्या असून पाणथळ जागांचा प्रश्न नाही असं त्यांनी स्पष्ट केलं.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि इतर अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

शासकीय जमिनीवरल्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासासाठी स्वयं किंवा समूह पुनर्विकास प्राधीकरणात स्वतंत्र सेलची निर्मिती करण्याचं आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं आहे. आमदार प्रवीण दरेकर, आमीन पटेल, सुनिल शिंदे यांच्यासोबत काल झालेल्या बैठकीत बावनकुळे यांनी हे आश्वासन दिलं. शासकीय भूखंडावरल्या इमारतींच्या स्वयं किंवा समूह पुनर्विकासासाठी धोरण ठरवून त्याचं सादरीकरण मुंबईतल्या आमदार आणि खासदारांपुढे केलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

